Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VII ISSUE- VII JULY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# मानवीय विचार प्रक्रिया

**डॉ. सुरेखा शर्मा**
प्राचार्य
शिलादेवी बी.एड. कॉलेज
एम.एड., एम.ए., पि.एच.डी.

प्राणीसृष्टीतील कोणत्याही प्राण्यापेक्षा मानव हा अधिक विवेकशील असा प्राणी आहे. आपल्या पूर्वानुभवांच्या साह्याने वास्तव परिस्थितीशी समायोजन साधण्यासाठी तसेच भविष्यकालीन जीवन सुखी होण्याच्या दृष्टीने विचार करण्याची क्षमता मानवामध्ये आहे. आता प्रश्न असा पडतो कि मानसशास्त्रीय दृष्टया विचार म्हणजे तरी काय ?

**विचार अर्थ :**


टेरीपेज व थॉमस यांच्या शैक्षणिक शब्दकोषामध्ये अर्थ पुढीलप्रमाणे आहे.

Thinking is the creation of order in the perceived world of objects and representation of objects.

अर्थात विचार म्हणजे अनबोधित वस्तूंच्या व वस्तूप्रतिमांच्या शृंखलाची निर्मिती होय.

विचार प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी एखादी समस्या यावी लागते जेव्हा मनुष्य एखाद्या अडचणीत सापडतो तेव्हा तो खऱ्या अर्थाने विचार करु शकतो. सवयीने ज्या क्रिया अडथळा न येता आपण करतो त्यावेळी विचार करण्याची गरजच निर्माण होत नाही. उदा. शाळेला सायकलवरुन नेहमीच्या रस्त्याने जात असता ‘एक दिवस काम चालू रस्ता बंद’ अशा पाटी दिसली कि एक क्षणभर आपण थांबून विचार करत व नवीन रस्ता शोधतो. तसेच बाजारात गेल्यावर पैसे कमी पडले तर मनुष्य विचार करतो कोणती अत्यंत आवश्यक वस्तू आधी खरेदी करायची हे ठरवतो तेव्हा त्या ठिकाणी तो विचार प्रक्रियेचा उपयोग करतो.

**विचार प्रक्रियेची विविध अंगे**





**अनुमानन :**

अनुमानन किंवा निष्कर्षण हे विचार प्रक्रियेच्या विविध अंगापैकी एक प्रमुख व वैशिष्ट्यपूर्ण असे अंग आहे. अनुमान म्हणजे निष्कर्ष किंवा तळ करण्याच्या दोन प्रमुख पध्दती आहे, ती म्हणजे

१) अवगामी पध्दती

२) उदगामी पध्दती या दोन्ही पध्दतीने अनुमान करता येते.




वरील चार पायऱ्याच्या साह्याने आपण विचार प्रक्रिया राबवित असतो. कूट उकलन पध्दतीने विचार प्रक्रियेला चालना मिळत असते या कूट उकलन मध्ये सर्व प्रथम समस्या निश्चिती केल्या जाते. प्रथम व्यक्तिला समस्येची जाणी होत असते. २) त्यानंतर दुसरी पायरी म्हणजे एकदा समस्या निश्चित झाली की तिच्या संबंधात असणाऱ्या माहितीचा वापर करुन संभाव्य पर्याय मांडले जातात या क्रियेमध्ये परस्पर संबधाला खूप महत्व असते. उदा. भूमितीमधील एखाद्या प्रशामध्ये कोणतीही माहिती दिलेली आहे तसेच त्यासंबंधी आपल्याकडे कोणती माहिती आहे याचा संबंध जोडण्याचा प्रयत्न करतो व त्यानुसार परिकल्पना मांडतो.

VOL- VII ISSUE- VII JULY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

**३) तीसरी पायरी परिकल्पनेची चाचणी :**

आपण ज्या विविध परिकल्पना मांडलेल्या असतात त्या विविध अशा परिकल्पनांची चाचणी घेतली जाऊन उतरादाखल एक परिकल्पना स्विकारुन इतर परिकल्पनाचा त्याग केला जातो. हि परिकल्पना म्हणजेच आपल्या समस्येची सोडवणूक असते.

**४) सर्वात शेवटी समाधान अवस्था :**

कोणत्याही समस्येचा सोडवणूक होताच व्यक्तीला एक प्रकारचे समाधान लाभते हा 'समाधान – अनुभव' ही कूट उकलनातील अंतिम अवस्था होय.

**आजच्या बालकांची विचार प्रक्रिया**

वरील माहिती वरुन आपण संक्षिप्त मध्ये विचार प्रक्रिया त्याच्या पायऱ्या माहिती अभ्यासली परंतु आजच्या बालकाच्या विचार प्रक्रियेला खऱ्या अर्थाने चालना मिळत आहे का ? आजचा विद्यार्थी हा स्वत:ला मोबाईल, टिव्ही, व्हीडिओ गेम यामध्ये बंदिस्त करुन घेत आहे त्याच्या वैचारिक प्रक्रियेला चालना मिळण्यासाठी हि मूल, कुट उकलन कल्पना, चिकित्सक विचार करतांना दिसत नाही. संस्कारीत असा धर्मग्रंथ, पुस्तक वाचन योग्य पिक्चर यांना पाहुण्यांचा आभाव या मुलांमध्ये दिसून येतो. त्यामुळे या मुलाच्या वैचारिक प्रक्रियेला थोडी एनिमेषन मार-धाड, स्टंड, अशा गोर्ष्टीची सवय झालेली आहे. करीता योग्य असा विचार-प्रक्रियेला चालना मिळतील असे नाही.

विद्यार्थ्यांमध्ये कोणतीही कल्पना किंवा विविध कल्पना सुचण्यासाठी पुरेशी अवधीची आवश्यकता असते. केवळ त्या मुलांना मर्यादित वेळ देऊन त्यामध्ये 'आता तुम्ही कल्पना करा' असे म्हणून काम भागत नाही. एखादी कल्पना चटकन सूचते तर एखादि कल्पना मृत स्वरुपात यायला काही तास नाहि तर वर्षानूवर्षे लागतात हे आपण लेखक व कविच्या अनुभवावरुन समजू शकतो.

आज चंद्रावर जाणाऱ्या जागतिक घोडदौड मध्ये विचार प्रक्रियेचे वेगळेच स्थान आहे आज अणूबॉम्बच्या वैशिक जगामध्ये आम्हाला सुपर कंम्प्युटर सारखे, विचार करणारे वैचारिक पत्र स्वरुपात बालकांना घडवायचे आहे त्याकरीता आजच्या युगानुसार विचार प्रक्रियेचे शैक्षणिक महत्व काय आहे यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. संगणक हे यंत्र आहे कल्पना, विचार नवीन नवीन निर्मिती हि त्यात भरणारे रोबोट, संगणक नेट, हे सर्व मनुष्य प्राणी. आजच्या युवा वर्ग तयार करतो आणि म्हणून विचार प्रक्रियेला चालणा मिळणे आवश्यक आहे.

**विचार प्रक्रियेचे शैक्षणिक महत्व :**

संगणक शिक्षण, स्मार्ट क्लास असे अनेक वैज्ञानिक तंत्रज्ञान बनवून शिक्षणाला आधुनिक स्वरुप प्राप्त झाले आहे.तरीहि शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे विचार करण्यास प्रवृत्त करणे हे शिक्षणाचे प्रमूख उद्दिष्ट आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे विचार करण्याची संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे.

१) अध्यापनात उद्गामी व अवगामी पध्दतीचा उपयोग केला पाहिजे. भूमिती मध्ये फक्त प्रमेय त्रिकोण चौकोन शिकवणे हे जुनी पध्दती झाली. आज या भूमितीचा उपयोग व उपयोजन कुठे केला जाईल याचे निरिक्षण करुन वैचारिक पातळीवर उतरवता आले पाहिजे.

२) निरीक्षण कसे करावे याबाबत मुलांना शाळेत मार्गदर्शन मिळाले पाहिजे. अ शाळेचा निकाल चांगला म्हणून ती शाळा चांगली, ब शाळेचा निकला कमी लागला म्हणून ती वाईट असा निष्कर्ष आधुनिक काळात योग्य नाही. तरी त्या शाळेची क्रिडा, प्रात्यक्षिक काय, वैज्ञानिक प्रदर्शने, मुलांचा सर्वांगीन विकास यावर त्या शाळेची योग्यता ठरण्याचे दिवस आले आहेत.

३) ठराविक वेळामध्ये शिक्षणाबदलच्या नव-नवीन समस्या विद्यार्थ्यांसमोर उभ्या करुन विद्यार्थ्यांच्या विचारांना गती द्यावी.

४) नव नवीन आरोग्यदायक समस्या द्या, आपली जीवन शैलीवर परिणाम करीत आहेत त्याच्या विचार करुन नव-नवीन विचार प्रक्रियेला चालना देण्यात याव्या.

५) भावनांचा पगडा आपल्या विचारसरणीवर होणार नाही, अशी शिकवण मुलांना द्यावी.

६) शिक्षक, मार्गदर्शक व तंज्ञ व्यक्तींनी आपले मत विद्यार्थ्यांवर लादू नये.

७) जुन्या कल्पना या प्रमाणित मानत नवीन कल्पना शक्तीला देखील चालना द्याव्या. त्यामध्ये काकतालीय न्यायाने काही वेळा घटना घडतात त्यामध्ये कार्यकारण संबंध जोडतांना विशेष दक्षता घेतली पाहिजे.
८) प्रत्येक विषयामध्ये चिकित्सक वृत्तीला अवसर असतो, अध्यापनात त्या दृष्टीने पूरेपूर फायदा घेतला पाहिजे.

विज्ञानातील निरीक्षण, भूमितीमधील प्रमेय इतिहासातील घटनांचा तुलनात्मक अभ्यास निरनिराळ्या देशांच्या भौगोलिक परिस्थितीची तुलना असा अनेक वैचारिक विषयाची तुलना इत्यादि बाबतीत शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विचार करुन निष्कर्ष काण्यास सांगावे.

विचार प्रक्रिया हि मानसशास्त्रातील अतिशय महत्वाची भूमिका आहे तिचा संगणक शिक्षणात अतिशय महत्वाचे स्थान आहे. त्यादृष्टीने यांचे महत्व जास्त आहे हि विचार प्रक्रिया मानसशास्त्राचे अभिन्न अंग ठरले आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१) सुलभ शैक्षणिक मानसशास्त्र -प्रा.प्रभाकर मानकर, नूतन प्रकाशन, पूणे
२) विकासाचे व अध्ययनाचे मानसशास्त्र - डॉ. शारदा रोवतेकर बडने
३) शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन -डॉ. अरविंद दुनाखे
४) शिक्षणाची तात्वीक आणि समाजशास्त्रीय भूमिका - डॉ. सौ. प्रतिभा सुधीर पेडके
५) शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र -वा. ना. दांडेकर
६) Wikipedia, google search